# राष्ट्रीय छात्र सेना  दिवस महाविद्यालयात साजरा

दि. २८ नोव्हे २०२१ रोजी श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात NCC   युनिट द्वारे राष्ट्रीय छात्र सेना  दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.  यानिमित्ताने वनोजा फाटा येथील गजानन महाराज मंदिर आणि भोलेनाथ वृद्धाश्रम येथे NCC कॅडेटनी साफ सफाई करून परिसर स्वच्छ करण्याचे कार्य केले. या कार्यासोबतच एक एकांकिका जनजागृती पर कॅडेटनी सादर केली.



## एनसीसी दिनी साफसफाई अभियान

**वनोजा।** श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय वनोजा येथील कॅडेट्स यांनी ७३ वा एनसीसी दिवस संत गजानन महाराज मंदिर वनोजा फाटा व भोलेनाथ महाराज वृद्धाश्रम येथे साफसफाई करून एनसीसी दिवस उत्साहाने साजरा केला १६ एप्रिल १९४८ रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मार्गदर्शनात एनसीसी युनिट ची स्थापना करण्यात आली होती. एकताआणि अनुशासन हे ब्रीद वाक्य असलेले एनसीसी आज स्थानिक श्रीमती साळूबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय वनोजा येथील कॅडेट्सनी विद्यालयात स्वच्छता मोहीम राबवून वनोजा मधून स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले नंतर स्थानिक संत गजानन महाराज मंदिर व भोलेनाथ महाराज वृद्धाश्रम येथे स्वच्छता मोहीम राबवून विविध कार्यक्रम महाविद्यालयात केले ज्यामध्ये नुक्कड नाटिका सादर करण्यात आली त्या नाटिके मार्फत स्वच्छतेचे आणि वृक्षारोपणाचे महत्व जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न कॅडेट्सनी केला कार्यक्रमाला ११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अकोला चे कर्नल सी पी भादोला सर यांनी विविध कार्यक्रम करून एनसीसी दिवस साजरा करण्याचे आवाहन केले आहे विद्यालयाचे प्राचार्य डॉ देवेंद्र गावंडे प्राध्यापक धनंजय पाथ्रिकर व एनसीसी विभागाचे लेफ्टनंट डॉ सुनील बोरचाटे यांनी एनसीसी चे महत्व सांगून कार्यक्रमाकरिता मार्गदर्शन केले.







गजानन महाराज मंदिर आणि भोलेनाथ वृद्धाश्रम येथे साफसफाई करताना कॅडेट